# महानुभाव साहित्य दर्शन

**महात्मा श्री .सुरेशराज राहेरकर ( एम.ए.बी.एड्.)**
**श्रीब्रह्मविद्या संशोधन आणि संपादन संस्था महानुभाव आश्रम तरडगाव ,ता. फलटण जि. सातारा.**

**०१.प्रस्तावना :-**

महाराष्ट्राच्या सांस्कृतिकचा इतिहास सर्वार्थाने वैभवशाली आणि दैदिप्यमान आहे . याची साक्ष वाङ्मयाच्या पानापानात आहे. समृद्ध असलेली वांग्मय परंपरा या संस्कृतीचा मुकुटमणी ठरते . भव्य वास्तु भौतिक समृद्धी दर्शवितात तर सकस साहित्यकृती आध्यात्मिक आणि वैचारिक विकासाची द्याेदक ठरते .

मराठी वाङ्मयाच्या प्रारंगणातील महानुभावीय साहित्याचे योगदान वैशिष्ट्यासह लक्षणीय आहे . वांग्मयीन गुणवैशिष्ट्यांसह महानुभावीय साहित्याची लांबी रुंदीच नव्हे तर खोली ही गहन आहे .आणि विस्तारही अथांग आहे.

महानुभावीय साहित्यामुळे मराठी वाङ्मयाचे दालन अधिकाधिक समृद्ध तर झालेच परंतु महाराष्ट्राच्या मातीतील समाजमन चंदनवत सुगंधित आणि सुशित बनलेले आहे हे मात्र निश्चितच.

**०२. मराठी भाषेला धर्म भाषा बनविणारे आद्य क्रांतिकारक श्री चक्रधर प्रभू :-**

बाराव्या शतकात गुजरातेतून महाराष्ट्रात येणाऱ्या श्री चक्रधर स्वामींनी महाराष्ट्राच्या मातीचं समाजमन जाणलं. स्वयंपूर्णतेने स्वतःच द्वैत तत्त्वज्ञान संस्कृतीची मिरासदारी मोडीत काढून जनसामान्यांच्या मराठी लोकभाषेत समाजासमोर ठेवलं हे अत्यंत क्रांतिकारक असे पाऊल होते .अर्थातच त्यामुळे प्रस्थापितांसोबत त्यांना प्रचंड संघर्ष करावा लागला. धर्मपीठ असणाऱ्या पैठणच्या धर्मशाळा ओस पडू लागल्या. सर्वज्ञांच्या विचार प्रभावाने भारावल्या .सर्वज्ञांचा आनिवार मराठमोळा संवाद जनसामान्यांना सुखावू लागला .या मराठी भाषा प्रेमातूनच महानुभाव पंथाचे शेकडो शिष्य अनुग्रहीत झाले . आद्य गद्य लिळाचरित्र ग्रंथ हा त्याचा साक्षीदार आहे.

**मी तुमचा अस्मात् कस्मात् नेणे गा: मज श्री चक्रधरे निरुपिली मराठी तियाची पुसा:** श्री नागदेवाच्या उक्तीतून झळाळणाऱ्या बाणवकशी मराठी प्रेमातून असंख्य शिषोत्तम प्रेरित झाले. संपूर्ण भारतभर विचार प्रचारातून मराठी भाषा महाराष्ट्राच्या बाहेर प्रथमच गेली. ती तिथे रुजली. उत्तर हिंदुस्तानात आणि आत्ताच्या पाकिस्तानात शेकडो पंथीय मंदिरे उभारली गेली. 3तेथे हजारो भक्त परिवार जोडला गेला .जो मराठी भाषेत पूजा, पारायण, भजन, कीर्तन ,प्रवचन श्रवण करू लागला. एकूणच शेकडो वर्षांपूर्वी महानुभावांनी मराठी भाषा अटकेपार नेली हे वास्तव ग्रंथाधारे तरी आता स्वीकारायला हवं.

**०३. महानुभावीय वांग्मय निर्मितीच्या प्रेरणाआणि हेतू :-**

स्मरण चिंतन करणाऱ्या आचार्य श्रीनागदेवांना पंडित म्हइंभट्टांनी यांनी विचारले, " भटाे , तुम्ही निरंतर काइसेयाचे चिंतन करीत असा ?" तेव्हा आचार्यश्री म्हणाले, " मिया गाेसावियांच्या अमाेघा स्त्राविया लीळांचे चिंतन करीतु असे . या संवादातूनच पंडित नम्हइंभट्टांना सर्वज्ञांच्या लीळांचे संकलन करण्याची कल्पना सुचली .या घटनेतूनच विदर्भाच्या रिद्धपूर प्रांती सर्वप्रथम ग्रंथ निर्मितीचं बीज अंकुरित झालं.

श्री नागदेवाचार्यांची प्रबळ प्रेरणा, अंतकरणातील भक्तीचा ओलावा, चित्तवृत्ती यातून ग्रंथ निर्मितीला आरंभ झाला. ईश्वरीय गुणांनुमोदनाला स्मरणभक्तीचा अधिष्ठान लाभलं .सर्वज्ञांच्या विचारांनी या मृदेला सुसंस्कारांना पुलकित करावं ही विशुद्ध प्रेरणा आणि हेतू बाळगून साहित्य सरिता प्रवाहित झाली. श्री गुरूंकडून **ग्रंथु निका झाला असे** अभिप्राय येऊ लागले .ग्रंथकार भारावले लेखणी घेऊन सरसावले. त्यातून वाङ्मय गंगेला महापूरच आला आणि महाराष्ट्राच्या मातीत साहित्य सोनियाच्या खाणी पिकू लागल्या.

**०४.विपुल गद्य संपदा:-**

महानुभावीय साहित्याने आणि मराठी वांग्मय प्रांताला सुमारे साडेसहा हजार एवढी प्रचंड ग्रंथसंपदा बहाल केली. वांग्मय गुणवैशिष्ट्यांसह एवढ्या मोठ्या संख्येने साहित्य सेवा करणारा हा जगाच्या पाठीवरील एकमेव सांप्रदाय असेल. लीळाचरित्र हा मराठी भाषेतील आद्य गद्य ग्रंथ शके बाराशेच्या दरम्यान पंडित म्हइंभट्टांनी संकलित केलेला सुमारे दीड हजार लिळांचा ग्रंथ सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामींचे संपूर्ण जीवनचरित्र, समाजातील विहरण वर्तनासहित भक्त परिवाराचे टिपलेले यथार्थ बारकावे हे या ग्रंथाचे वैशिष्ट्य.

अत्यंत सरळ रसाळ आणि ओघवती भाषाशैली बोलीभाषेतील चटकदार संवादामुळे वाचकांसमोर घटनेचा पट चित्रासारखा उलगडत जाताना दिसतो. लीळाचरित्र हा बीज ग्रंथच आहे .कारण या ग्रंथातून प्रेरणा घेऊन अनेक विद्वान प्रतिभावंतांच्या लेखणीला मती आणि गती प्रदान केली. रिद्धपूर चरित्रे हा गोविंद प्रभूचा लीळांचा ग्रंथ श्रीनागदेव आणि त्यांच्या शिष्य परिवारांच्या घटना संदर्भाचा स्मृतिस्थळ ग्रंथ नंतरच्या आचार्य परंपरेचे वृद्धाचार अन्वयस्थळ सर्वज्ञांच्या श्रीमुखाेक्त सूत्रपाठ, दृष्टांतपाठ या तत्वज्ञानावरील भाष्य ग्रंथ असे अनेक ग्रंथ विविध वैशिष्ट्यांनी परिपूर्ण अनेक ग्रंथ आकाराला आले.

याशिवाय स्थानपोथी सारखा स्थळ विश्लेषक भूगोल ग्रंथ तर भाषेची शिस्त निर्माण करणारा पंचवार्षिक असा मराठीतील पहिला व्याकरण ग्रंथ अशा विविधांगी ग्रंथ साहित्य रचना विपुल प्रमाणात झाली. पूर्ण पुरुषोत्तम भगवान गोपालकृष्णांच्या श्रीमद्भगवद्गीतेवर विविध अर्थाच्या सुमारे 40 गीता टीकातून नवनवाेन्मेष शालिनी प्रतिभेचा परिमळ दरवळू लागला.

**०५. विस्तारित काव्यगंगा :-**

श्री गोविंद प्रभूच्या आवाे मेली जाय कृष्ण रुक्मिणी गाय म्हणे: या महादंबेला दिलेल्या आशीर्वाचनातून धवळे या उस्फूर्त काव्य गंगेचा उगम झाला. श्रीकृष्ण रुक्मिणीच्या विवाह सोहळ्याचे वेधक वर्णन अत्यंत मनोहारी पद्धतीने यात आलं आहे.

यातूनच कवी नरेंद्रांच्या उत्तुंग प्रतिभेचा व्यासंगी विलास असणारे रुक्मिणी स्वयंवर (१२१५)काव्यग्रंथ, पंडित दामोदरव्यासांचा श्रीकृष्ण कथेवर आधारित वच्छाहरण ग्रंथ (१२३८),पंडित भास्करभट्ट बोरीकरांचा शिशुपालवध(१२३४), आणि उद्धवगीता(१२३५) नारायणव्यास यांचा रिद्धपुरवर्णन(१३४०), तर रवळोव्यासांचा सह्याद्रीवर्णन(१२७५), पंडित विश्वनाथव्यासांचा ज्ञानप्रबोध ग्रंथ(१३४०), आणि सुमारे 3051 ओव्यांचा अत्यंत रसाळ असा केशराजव्यासांचा मूर्तीप्रकाश यासह अत्यंत विशाल अशी काव्यगंगा प्रवाहित झाली. जिला अबाब, मूर्तीवर्णने, दोहे ,चौपद्या, आरत्या ,भजने ,कटाव इत्यादी काव्यप्रकार येऊन मिळाले.

**०६. वांग्मयीन संरक्षणासाठी केला सांकेतिक लिपीचा वापर:-**

महानुभाव साहित्याची सकसता आणि शुद्धता पाहत असताना एक आगळीवेगळी गोष्ट लक्षात येते की, ती म्हणजे ग्रंथकारांनी केलेल्या सांकेतिक लिपीचा वापर रवळोव्यासांनी सर्वप्रथम शके 1275 मध्ये सकळलीपि (नागरलिप) संशोधित केली .अत्यंत कौशल्यपूर्ण खुबीने मराठी मुळाक्षरांची अदलाबदल करीत लिपीचा शोध लावला. सांकेतिक लिपीचा वापर केल्याने ग्रंथामध्ये अपपाठ घुसणार नाही याची खात्री पटल्याने अनेकांनी आपले ग्रंथीतस्थळ लिपीत ग्रंथीस्त केले. यातूनच साहित्याच्या रक्षणासाठी अंकलिपी, वज्रलिपी, सुभद्रालिपी, हंसलीपी, अशा सुमारे 43 लिप्यांचे संशोधन केले. या सांकेतिक लीप्यांच्या वापराने मूळ संहितेत प्रक्षेप घुसले नाहीत आणि साहित्याची शुद्धता निर्विवाद राहिली.

संपूर्ण जगाच्या पाठीवर साहित्याच्या प्रांतात चौदाव्या शतकात सांकेतिक लिपीचा वापर करून साहित्य साधनेची शुचिता अवलंबवनारा महानुभाव सांप्रदाय हा एकमेवाद्वितीय आहे. हे मान्य करावे लागते .त्यांची ही दूरदृष्टी आजच्या कोड लैंग्वेज पेक्षा कितीतरी आधीची होती हे मात्र निश्चित.

**०७. महानुभाव साहित्याची सर्वांगीण महत्त्व:-**

महानुभावीय साहित्य ग्रंथांमध्ये तत्कालीन जीवनाचे यथार्थ प्रतिबिंब पहावयास मिळते. कारण सर्वज्ञांचा वावर समाजातील तळागाळापर्यंत होता. त्यामुळे त्या काळातील समाजरचना ,जातीयता ,वर्णव्यवस्था, चालीरीती रूढी ,परंपरा, संवाद, आहार- विहार यांचे साद पडसाद लीळाचरित्रात आढळतात. समाज जीवनासोबतच ग्रामजीवन आणि तत्कालीन धर्मव्यवस्था, वृत्तवैकल्य, उपासतापास यात गांजलेला तरीही निष्ठेने धर्मगुरूंच्या छळाला कटाळणाऱ्या पापभिरू समाजाचा दर्शनही त्यात आढळते . महाराष्ट्राच्या सांस्कृतिक, ऐतिहासिक दृष्टीने या साहित्याचे मूल्य अनन्यसाधारण आहे. तीर्थयात्रा, देवदेवतै, कर्मकांडाचे, कृषीजीवनासोबतच बलुतेदार पद्धतीची रचना आणि यादवकालीन राज्यांतरी यात आढळतात. तसेच या उद्दमातून चाललेल्या आर्थिक गतिमानतेचाही उलगडा यात होतो.

**०८. महानुभाव साहित्याची वांग्मयीन गुणवैशिष्ट्ये:-**

१३ व्या शतकात मराठी वाङ्मयाच्या प्रारंभीस एवढा प्रौढ आणि परिपक्व वांग्मयीन प्रवाह निर्माण होणे हे अत्यंत अभिमानास्पद आहे .अंतरीच्या ओलाव्यातून, स्मरणभक्तीच्या प्रवाहातून आलेले हे साहित्य अत्यंत रसरशीत आणि समृद्ध असे झाले आहे .यातील भाषाशैली प्रौढ गंभीर तर

तसेच हळुवार चटकदार संवाद कौशल्याने त्यातील नाट्यमय्यता प्रभावी ठरते .म्हणूनच ती चटकन ओठावर रुळते वाचकाला ती आपलीशी वाटते. साधी, सोपी निवेदन पद्धती सुभाषितवजा भाषा ,छोटी छोटी वाक्य, म्हणी, वाक्प्रचार, अभिनव शब्दकलेमुळे बोली भाषेचे सामर्थ्य प्रमाण भाषेसोबत वावरताना आढळते. कमीत कमी शब्दात अधिक आशय व्यक्त करण्याची विलक्षण पद्धती तर अद्‌वितीयच. संपूर्ण साहित्य भाषा शास्त्राच्या दृष्टीने नामांची, क्रियापदांची ,निरनिराळी रूपे ओव्यांची ठेवण भाषेची ढब ही सर्व वैशिष्ट्ये सर्वसाधारण वाचकाच्या मनाला मोहिनी घालते. महानुभाव्य वाङ्मयाला वस्तुनिष्ठतेमुळे शास्त्र काट्याची कसोटी प्राप्त झाली आहे. शास्त्र लक्षणांनी युक्त असलेल्या या साहित्याची विश्वसनीयता आणि प्रभाव मात्र प्रचंड आहे . तत्कालीन सर्वच ग्रंथकार बहु श्रुत पंडित असल्यामुळे विविध रस अलंकाराने हे साहित्य ओतप्रोत भरलेले आहे.

**०९. महानुभाव वांग्मय परंपरेची विलक्षणता :-**

महानुभाव ग्रंथकारांनी मराठी वाङ्मयाचा पाया घातला .हे सर्वश्रेष्ठ जाणकारांचे विधान आता सर्वमान्य झाले आहे. मराठी वाङ्मयाच्या रम्य पहाटे इतकी सर्वांगीण आणि सकस साहित्य निर्मिती व्हावी हे केवढे विलक्षण. ईश्वरीय प्रेरणेतून आणि अंतकरणाच्या नितळ गाभाऱ्यातून आलेला हुंकार केवळ अप्रतिमच. प्राचीन मराठीतील उत्कृष्ट वांग्मयाचा अर्ध्याहून अधिक भाग या पंथाने निर्मिलेला आहे. काळाच्या ही पुढे जाऊन अत्यंत दूरदृष्टीने भेसळ होऊ नये. म्हणून केलेला सांकेतिक लीपीचा वापर ही या साहित्याची वैशिष्ट्यपूर्ण बाजू मानावी लागते .चरित्रग्रंथ, सूत्रपाठ, दृष्टांतपाठ, धवळे, सप्तकाव्यग्रंथ, काव्यभाष्यग्रंथ, इत्यादी अशा अत्यंत विशाल आणि वैविद्यपूर्ण दर्जेदार ग्रंथ सरिता यातून सुमारे 6 हजार ग्रंथाचे विपुल वांग्मय परंपरा संप्रदायाने मराठी साहित्याला प्रदान केली. महानुभावीय साहित्याने एेहिक आणि पारित्रिक अशा दोन्ही स्तरावर कार्य करीत जनजागरण घडविले. यातून व्यसनमुक्ती आणि परमप्रीतीनं युक्त असा आणि खूप साधक आणि समाज घडविला हे लोकविलक्षण कार्य मानावं लागत.

**१०.उपसंहार :-**

अशाप्रकारे महानुभावीय वाङ्मयाच्या सर्व वाटा आणि वळणे, सर्व दिशा, कक्षा या अत्यंत मुलगामी आणि विस्तारित आहेत. केवळ प्रतिष्ठेसाठी साहित्यनिर्मिती न करता अंतरीच्या उमाळ्यातून श्रद्धास्थानाला केलेलं ते अभिवादन आहे. विजनवासात, रानावनात भिक्षांवर जगून प्रसंगी समाजाचा उपहास सहन करीत अभिजात साहित्याला जन्म देणाऱ्या असंख्य महानुभावांच्या पिढ्यानपिढ्या सातशे वर्षापासून प्रसिद्ध परांगमुख राहिल्या. अविचलनिष्ठेने साहित्य साधना करणाऱ्या या महानुभाव पंथाचे समाजऋण साहित्यकांनी आदराने आणि प्रामाणिकपणे व्यक्त करावे हीच केवळ अपेक्षा.